MHRT080001452022

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १७/२०२२**
**मधील निशाण ५१ खालील आदेश**

वादीनी सदरचा दावा वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांनी तसेच त्यांच्या कुटुंबियांची बोरश्वर मंदीरामध्ये पुजा-अर्चा, जलवृष्टी इत्यादी धार्मिक कार्य करण्याचा हक्क आहे असा ठराव होवून मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला दि. २०/०८/२०२२ रोजीचा "कैफियत नाहीचा" आदेश रद्द करण्यात यावा याकरीता केलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. ४ ते ६ याचा वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादी क्र. ४ ते ६ च्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी वयोवृध्द असल्याने शारीरीक व्याधीनी ग्रस्त असतात तसेच प्रतिवादी क्र. ५ व ६ बाहेरगावी वास्तव्यास असल्याने प्रवास करुन तारेखला उपस्थीत राहणे दरवेळी शक्य झाले नाही. याकामी कैफियत दाखल न करण्यामागे त्यांचा कोणताही गैरहेतू नव्हता. या प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न मिळाल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होवू शकते. याउलट वादीचे विशेष नुकसान होणार नाही. सबब झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्दबातल होवून मिळावा अशी विनंती त्यांनी केली.

४. प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील श्री लिंबूकर यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले की, विनाकैफियतीचा आदेश पारीत होवून जवळपास १ वर्षापासून अधिक कालावधी झालेला आहे. दाव्याला जाणून बुजुन

विलंब करण्याचा हेतू यामागे आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा व प्रस्तावित प्रतिवादीना जास्तीत जास्त खर्चाची रक्कम लादण्यात यावी.

**५.** अर्जाच्या पुष्टयर्थ प्रतिवादी क्र. ४ ने नि. ५२ येथे, प्रतिवादी क्र. ५ ने नि. ५३ येथे व प्रतिवादी क्र. ६ ने नि. ५४ येथे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

**६.** अर्ज पाहिला. अर्जातील कथने पाहिली. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र.४ ते ६ विरुध्द वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांच्या हक्क संबंधी ठराव घोषीत करुन मिळावा या संदर्भात तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याविरुध्द निरंतरची ताकीद मिळविण्याकरीता दाखल केलेला आहे. या कामी प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचे म्हणणे अभिलेखावर येवून या संदर्भात त्यांचा पुरावा विचारात घेणे गरजेचे आहे. केवळ तांत्रिक कारणास्तव झालेल्या विलंबाकरीता सदरच्या प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरुन नाही. निश्चीतच दि. २०/०८/२०२२ म्हणजे तब्बल १ वर्षाहून अधिक कालावधीनंतर दि. १४/१२/२०२३ रोजी हा अर्ज दाखल केलेला आहे. याकामी प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुष्कळ कालावधी प्राप्त झाला असताना देखील त्यांनी विलंब केला ही बाब स्पष्ट होते. मात्र त्याकरीता योग्य ती खर्चाची रक्कम लादून त्यांचे म्हणणे अभिलेखावर येण्यासाठी विनाकैफियतीचा आदेश रद्दबातल करणे न्यायोचित ठरेल. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि. ५१ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना आजच्या अथवा पुढील तारखेस एकूण रक्कम रुपये १,०००/- देणेच्या अटीवर प्रतिवादी क्र.४ ते ६ विरुध्द झालेला

विनाकैफियतचा आदेश रद्द करणेत येतो.

३. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर कैफियत त्वरीत दाखल करावी व दाखल केलेली असल्यास ती वाचून दाखल करावी.

सही/-

**स्थळ - देवरुख**
**दि. ०८/०१/२०२४**

**(श्रुती ह. पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**